नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक ०४/०४/२०२६ (शनिवार)

---

## मा. पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण, जिल्हा यांच्या मार्गदर्शनात अचानक कारवाई करत रेती तस्कारांविरूध्द ३ गुन्हे नोंद ३ वाहनासह १ कोटी ५१ लाख २४ हजार ५०० रूपयांचा मुद्देमाल जप्त

मा. श्री. हर्ष ए. पोद्दार, पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा यांना अवैध रेती चोरी/तस्करी बाबत तक्रारी प्राप्त झाल्या होत्या. त्या तक्रारींची गंभीर दखल घेत. मा पोलीस अधिक्षक यांनी स्थानिक गुन्हे शाखेला अचानक कारवाई करण्याचे आदेश दिले. दिनांक ०४/०४/२०२६ रोजी मा. पोलीस अधिक्षक यांच्या मार्गदर्शनात स्थानिक गुन्हे शाखेच्या विविध पथकांनी अचानक पणे रेती तस्करांवर विविध पोलीस स्टेशन अंतर्गत कारवाई केली. पोलीस स्टेशन नरखेड, काटोल आणि रामटेक हद्दीत कारवाई करून खालीलप्रमाणे ३ गुन्हे नोंद करण्यात आले आहे.

पोलीस स्टेशन नरखेड :— स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने पोस्टे नरखेड हद्दीतील सिंदी उमरी येथे नाकाबंदी करून टाटा कंपनीचा १० चक्का टिप्पर क्रमांक एम एच—४०/डी सी—२५०७ या वाहनाला थांबवुन वाहनाची पाहणी केली असता त्यामध्ये रेती (गौणखनिज) आढळुन आली. टिप्परचा चालक नामे १) **गणेश सदाशिव रेवतकर, वय ३८ वर्ष, रा. मालापूर, ता. नरखेड, जि दृ नागपूर हा मिळुन आला. मालकाचे नाव विचारले असता गुणवंत रामरावजी बोडखे, वय ५२ वर्षे, रा. सावरगाव जि. नागपूर अशी माहिती प्राप्त झाली.** पोलीसांनी **आरोपी चालकास रेती वाहतूकीच्या परवान्याबाबत** विचारपुस केली असता त्याच्याकडे कोणताही परवाना नसल्याबाबत माहीती प्राप्त झाली. **पोलीसांनी पंचासमक्ष वर नमुद वाहन** १० चक्का टिप्पर क्रमांक एम एच—४०/डी सी—२५०७ किंमती

५०,००,०००/—रूपये २) ६.२५ ब्रास रेती किंमती ३१,७५०/— रूपये असा एकुण ५०,३१,७५०/— रूपयांचा मुद्देमाल जप्त केला.

पोलीस स्टेशन काटोल :— स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने पोस्टे काटोल हद्दीतील घुबडमेट येथे नाकाबंदी करून टाटा कंपनीचा १० चक्का टिप्पर क्रमांक एम एच—४०/बी झेड— २६३८ हे वाहन थांबवुन वाहनाची पाहणी केली असता त्यामध्ये रेती (गौणखनिज) आढळुन आली. **टिप्परचा चालक नामे १) प्रदीप रमण शहा वटके, वय २७ वर्ष, रा. डोडरिया, ता. आमला, जिल्हा बैतूल मध्यप्रदेश, हल्ली मुक्काम वरूड तालुका वरुड, जिल्हा अमरावती हा मिळुन आला. मालकाचे नाव विचारले असता पलाश दिलीप राऊत, राहणार पोस्ट ऑफिस चे मागे वरुड, जिल्हा अमरावती** अशी माहिती प्राप्त झाली. पोलीसांनी आरोपी चालकास रेती वाहतूकीच्या परवान्याबाबत विचारपुस केली असता त्याच्याकडे कोणताही परवाना नसल्याबाबत माहीती प्राप्त झाली. पोलीसांनी पंचासमक्ष वर नमुद वाहन १० चक्का टिप्पर क्रमांक एम एच—४०/बी झेड— २६३८ किंमती ५०,००,०००/—रूपये २) ८.५५ ब्रास रेती (गौणखनिज) किंमती ४२,७५०/— रूपये असा एकुण ५०,४२,७५०/— रूपयांचा मुद्देमाल जप्त केला.

पोलीस स्टेशन रामटेक :— स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने पोस्टे रामटेक अंतर्गत बसस्टॅड रामटेक येथे नाकाबंदी करून टाटा कंपनीचा १२ चक्का टिप्पर क्रमांक एम एच—४०/डी सी—१८२७ मिळून या वाहनाची पाहणी केली असता त्यामध्ये रेती (गौणखनिज) आढळुन आली. टिप्परचा चालक नामे १) **कल्पेश सोनटक्के, वय ३५ वर्ष, रा. कन्हान, ता. पारशिवणी, जि. नागपूर हा मिळुन आला. मालकाचे नाव विचारले असता पारीख, रा. नागपूर अशी माहिती प्राप्त झाली**. पोलीसांनी आरोपी चालकास रेती वाहतूकीच्या परवान्याबाबत विचारपुस केली असता त्याच्याकडे कोणताही परवाना नसल्याबाबत माहीती प्राप्त झाली. पोलीसांनी पंचासमक्ष वर नमुद वाहन टाटा कंपनीचा १२ चक्का टिप्पर क्रमांक एम एच—४०/डी सी—१८२७ किंमती ५०,००,०००/—रूपये २) १० ब्रास रेती (गौणखनिज) किंमती ५०,०००/— रूपये असा एकुण ५०,५०,०००/— रूपयांचा मुद्देमाल जप्त केला.

**वर नमुद तिन्ही कारवाई मध्ये एकुण २४.८० ब्रास रेती आणि तिन वाहने असा एकुण १,५१,२४,५००/— रूपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. नमुद प्रकरणी आरोपींविरूध्द पोलीस स्टेशन नरखेड, काटोल आणि रामटेक येथे कलम ३०३(२), ४९ भा.**

न्या.सं. सहकलम ४८(७), (८) महाराष्ट्र जमिन महसुल अधिनियम, सहकलम ४, २१ खाणी आणि खनिजे अधिनियम व सहकलम ३ सार्वजनिक संपत्ती नुकसान प्रतिबंध अधिनियम, सहकलम १५ पर्यावरण संरक्षण अधिनियम अन्वये ३ गुन्हे दाखल करण्यात आले आहे.








कारवाई करणारे पोलीस पथक जप्त मुद्देमालासह

## ५.८५९ किलो गांजा आणि वाहन असा एकुण १ लाख ९७ हजार ६८० रूपयांचा मुद्देमाल जप्त, आरोपींविरूद्ध गुन्हा नोंद, २ आरोपी अटक कन्हान पोलीसांची कामगिरी

पोलीस स्टेशन कन्हान :— दिनांक ०३/०४/२०२६ रोजी कन्हान पोलीस पेट्रोलींग करीत असतांना त्यांना गुप्त बातमीदाराने खात्रीशिर माहीती दिली की, अरोपी क्रं १) नितेश उर्फ बिट्टु रमेश भुते आणि आरोपी क्रं २) शैलेश बन्सीलाल अकोने हे दोघे आपले होंडा शाईन मोटार सायकल क्र. एम एच ४० ए जी ४२७६ ने नागपुर कडुन कामठी मार्गे कन्हान कडे अंमली पदार्थ गांजा विक्री करीता आणत आहे. कन्हान पोलीसांनी सदर माहीती मा. श्री हर्ष ए. पोद्दार, पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा ,श्री अनिल म्हस्के, अपर पोलीस पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण आणि श्री संतोष गायकवाड, उपविभागिय पोलीस अधिकारी, कन्हान विभाग यांना देत त्यांच्या मार्गदर्शनात मिळालेल्या माहीतीच्या आधारे सापळा रचुन नागपुर जुने कन्हान पोलीस स्टेशन नागपुर ते जबलपुर महमार्गावर नाकाबंदी केली. नाकाबंदी

दरम्यान होंडा शाईन मोटार सायकल क्र. एम एच ४० ए जी ४२७६ मिळुन आली. पोलीसांनी मोटर सायकलवरील दोन्ही आरोपी अनुक्रमे **१. नितेश उर्फ बिट्टु रमेश भुते, वय २८ वर्षे,रा. महाजन नगर, टेकाडी,ता. पारशिवनी आणि २. शैलेश बन्सीलाल अकोने, वय ४० वर्षे,रा. वार्ड क्र. ०३ पिपरी कन्हान , नागपुर** यांना ताब्यात घेत त्यांच्या कडील बॅग ची झडती घेतली बॅगमध्ये ठेवलेल्या ६ पॅकेट मध्ये गांजा सदृश्य पदार्थ मिळुन आला.

**नमुद आरोपीच्या ताब्यातुन १) अंमली पदार्थ गांजा ५.८५९ किलोग्रॅम किंमती १,१७,१८०/—रुपये आणि २) होंडा शाईन मोटार सायकल क्र. एम एच ४० ए जी ४२७६ किंमती ७०,०००/—रुपये आणि दोन मोबाईल असा एकुण १,९७,६८०/— रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. नमुद प्रकरणी आरोपीतांविरूद्ध पोलीस स्टेशन कन्हान येथे कलम ८(क), २० (ब), (ii),(ब), २९ एन.डि.पि.एस. कायदयान्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे. दोन्ही आरोपींना अटक करण्यात आली आहे. साखळी पुरावे जोडुन पोलीस सदर प्रकरणाचा तपास करीत आहेत.**




कारवाई करणारे पोलीस पथक जप्त मुद्देमालासह

# कोंबडयांची झुंज लावुन जुगार खेळणाऱ्यांवर १३ आरोपींवर गुन्हा नोंद. ७ दुचाकी वाहनासह ४ लाख १६ हजार ३१० रूपयांचा मुद्देमाल जप्त उमरेड पोलीसांची कामगिरी

पोलीस स्टेशन उमरेड :— दिनांक ०३/०४/२०२६ रोजी उमरेड पोलीसांना गुप्त बातमीदारांकडुन खात्रीशीर माहीती मिळाली की, मौजा हेवती पटाच्या दानीजवळ कोंबडयाची झुंज लावून पैशांचा हारजितचा जुगार खेळत आहे. मिळालेल्या माहीतीच्या आधारे उमरेड पोलीस घटनस्थळी पोहचले असता, मौजा हेवत शेतशिवार येथे काही इसम कोंबडयांच्या पायाला धारदार काती बांधुन त्यांच्यी झुंज लावुन पैशांचा हारजितचा खेळ खेळतांना दिसुन आले. पोलीसांनी **आरोपी क्र. १) विनोद मुरलीधर बेले, वय ४० वर्षे, रा. मंगळवारीपेठ उमरेड २) सुरती नारायनराव तेलरांदे,वय ४७ वर्षे, रा. मंगळवारीपेठ उमरेड ३) विलास ईश्वर तांबेकर,वय ४४ वर्षे, रा. मंगळवारी पेठ, उमरेड ४) स्वप्नील शरदराव पालांदुरकर,वय ४२ वर्षे, रा. बुधवारीपेठ उमरेड ०५) मोहन फकीराजी बालपांडे, वय ४३ वर्षे,रा. चिचघरे लेआउट, उमरेड ०६) राजु रामचंद्र चाफले, वय ६६ वर्षे,रा. पुर उमरेड ०७) आशिष अरून लाखे, वय ३८ वर्षे,रा. ईतवारीपेठ उमरेड ०८) दिलीप गोविंदराव राखुडे,वय ४५ वर्षे, बुधवारीपेठ उमरेड ०९) अविनाश सकाराम नंदनवार, वय २५ वर्षे,रा. ईतवारीपेठ उमरेड १०) अक्षय वसंतराव पाटील,वय २८ वर्षे, रा. ईतवारीपेठ उमरेड ११) योगेश लक्ष्मण निखार,वय ५३ वर्षे, ईतवारीपेठ उमरेड १२) सुधीर कृष्णाजी बावनकर, वय ५५ वर्षे, रा. मंगळवारीपेठ उमरेड १३) बादल नारायन लेंडे, वय ३२ वर्षे, रा. ईतवारीपेठ उमरेड यांना** शिताफिने जागीच पकडले.

पोलीसांनी पंचासमक्ष आरोपीतांच्या ताब्यातून रोख १०,३१०/— रूपये, २) ०२ जिवंत कोंबडे काती बांधलेले किंमती १,०००/—रूपये ३) ०७ मोटरसायकल किंमती ४०५०००/—रूपये असा एकुण ४,१६,३१०/— रूपयाचा मुद्देमाल पंचासमक्ष जप्त केला आहे. आरोपीतांविरूद्ध पोलीस स्टेशन उमरेड येथे कलम १२ (ब) म. जु. का. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.



कारवाई करणारे पोलीस पथक जप्त मुद्देमालासह

## नागपुर ग्रामीण जिल्ह्यातील ७३९ रेकॉर्डवरील आरोपीतांची घेण्यात आली आरोपी परेड

मा. श्री हर्ष ए. पोद्दार, पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा यांच्या मार्गदर्शनात आज दिनांक ०४/०४/२०२६ रोजी नागपुर ग्रामीण जिल्हयातील सर्व २२ पोलीस स्टेशनला शरीराविरूध्दचे गुन्हे करणारे, मालमत्ते विरूध्दचे गुन्हे करणारे, महीला व बाल अत्याचार गुन्हेगार ,अवैध दारू, जुगार इतर अवैध धंदयामधील रेकॉर्डवरील आरोपींतांची आरोपी परेड घेण्यात आली आहे. **एकुण ७३९ आरोपीतांची आरोपी परेड घेण्यात आली आहे.**

**नागपुर उपविभाग** :— नागपुर उपविभागातील पोलीस स्टेशन बुटिबोरी येथे ३३ आरोपी, पोलीस स्टेशन एमआयडीसी बोरी येथे ३० आरोपी आणि पोलीस स्टेशन बेला येथे ३३ आरोपी अशा एकुण ९६ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**उमरेड उपविभाग** :— उमरेड उपविभागातील पोलीस स्टेशन उमरेड येथे ३६ आरोपी , पोलीस स्टेशन कुही येथे ३२ आरोपी आणि पोलीस स्टेशन भिवापुर येथे २६ आणि पोलीस स्टेशन वेलतुर ३० आरोपी अशा एकुण १२४ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**सावनेर उपविभाग** :— सावनेर उपविभागातील पोलीस स्टेशन सावनेर येथे ३१ आरोपी , पोलीस स्टेशन कळमेश्वर येथे ३१ आरोपी आणि पोलीस स्टेशन खापा येथे २८ आरोपी

आणि पोलीस स्टेशन केळवद येथे ३० आरोपी अशा एकुण १२० रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**कन्हान उपविभाग** :— कन्हान उपविभागातील पोलीस स्टेशन कन्हान येथे ३५ आरोपी , पोलीस स्टेशन मौदा येथे १५ आरोपी पोलीस स्टेशन वडोदा येथे १३ आरोपी अशा एकुण ६३ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**रामटेक उपविभाग** :— रामटेक उपविभागातील पोलीस स्टेशन रामटेक येथे ५३ आरोपी , पोलीस स्टेशन पारशिवणी येथे ३४ आरोपी, पोलीस स्टेशन अरोली येथे २८ आरोपी आणि पोलीस स्टेशन देवलापार येथे येथे २४ आरोपी अशा एकुण १३९ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**काटोल उपविभाग** :— काटोल उपविभागातील पोलीस स्टेशन काटोल येथे ७४ आरोपी , पोलीस स्टेशन कोंढाळी येथे ३१ आरोपी आणि पोलीस स्टेशन नरखेड येथे ५५ आरोपी आणि पोलीस स्टेशन जलालखेडा येथे ३७ आरोपी अशा एकुण १९७ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**(सर्व ६ उपविभागातील सर्व २२ पोलीस स्टेशन येथे एकुण ७३९ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे. )**





मा. पोलीस अधिक्षक
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर
यांच्या मान्यतेने